**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५६/२०२०** **दिनांक १४/०७/२०२०** **कालावधी ५ दिवस**



**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०८/०७/२०२० ते १४/०७/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १५/०७/२०२० सकाळी ८:३० पासून १९/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८/०७ | ०९/०७ | १०/०७ | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ | | १५/०७ | १६/०७ | १७/०७ | १८/०७ | १९/०७ |
| ७७.६ | ८०.४ | ६५.० | ६०.६ | १५.२ | ९.८ | ७६.८ | पाऊस (मिमी) | ६९ | १०३ | ६६ | २६ | ५१ |
| २८.५ | २७.१ | २८.० | २९.५ | ९.५ | २८.५ | २९.० | कमाल तापमान (अं.से) | २८ | २८ | २९ | २९ | २९ |
| २४.२ | २४.१ | २४.१ | २३.० | २३.० | २३.५ | २३.० | किमान तापमान (अं.से) | २४ | २३ | २४ | २४ | २४ |
| ४ | ४ | ४ | ८ | ६ | ६ | ६ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ८ | ६ | ७ |
| ९३ | ९३ | ९३ | ९८ | ९६ | ९८ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९४ | ९५ | ९३ | ९३ | ९१ |
| १०० | १०० | ८६ | ९२ | ८६ | १०० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ८२ | ९२ | ८९ | ८४ | ७५ |
| १०.४ | ७.१ | ५.७ | ४.५ | ४.९ | ४.२ | ५.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३ | १३ | १२ | ७ | ४ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | नै. | वाऱ्याची दिशा | प. | नै.प. | नै. | नै.द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ३८५.४ | १६४९.९ | ५१३०.९ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १५ ते १९ जुलै, २०२० दरम्यान रत्नागिरी जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे.**

**इशारा: दिनांक १५ जुलै रोजी जिल्ह्यातील काही ठिकाणी जोरदार आणि तुरळक (१ किंवा २) ठिकाणी अति जोरदार पाऊसाची शक्यता असून दिनांक १६ ते १८ जुलै दरम्यान तुरळक (१ किंवा २) ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोंकण विभागात दिनांक १९ ते २५ जुलै २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **रोप अवस्था** | • लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत भात खाचरात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात खाचरातील बांध तणमुक्त ठेवावेत जेणेकरून भात पिकावर किडींचा प्रादुर्भावावर आळा घालण्यास मदत होईल. |
| **नागली** | **पुर्नलागवड** | • मध्यम पाऊसाची शक्यता लक्षात घेता नागली पुर्नलागवडीची कामे पूर्ण करून घ्यावीत. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • निसर्ग चक्रीवादळातील नुकसान ग्रस्त आंबा बागेमधील पुर्नस्थापित झाडांचे बुरशीजन्य रोगापासून आणि खोडकिडी पासून संरक्षण करण्यासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण आणि क्लोरपायरीफॉस २०% प्रवाही २ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र द्रावणाची दुसरी फवारणी पाऊसाची तीव्रता कमी असताना करावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • निसर्ग चक्रीवादळातील नुकसान ग्रस्त काजू बागेमधील पुर्नस्थापित झाडांचे बुरशीजन्य रोगापासून आणि खोडकिडी पासून संरक्षण करण्यासाठी १ टक्का बोर्डोमिश्रण आणि क्लोरपायरीफॉस २०% प्रवाही २ मि. ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून स्वतंत्र द्रावणाची दुसरी फवारणी पाऊसाची तीव्रता कमी असताना करावी. |
| **टोमेटो** | **वाढीची अवस्था** | • टोमेटो पिकास नत्र खताची दुसरी मात्रा एकरी ४३ कि.ग्रॅ. युरिया रोपांच्या पुर्नलागवडीनंतर ३ ते ५ आठवड्यानी पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **वाढीची अवस्था** | • पडवळ, दुधीभोपळा, लाल भोपळा वेलवर्गीय पिकांना नत्र खताची दुसरी मात्रा १० ग्रॅम युरिया प्रति वेलीला लागवडीनंतर १ महिन्यांनी पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा.<br>• कारली, पडवळ, दुधीभोपळा, दोडका भाजीपाला पिकावर तांबडे भुंगे, पाने खाणारी अळी, पाने पोखरणारी अळी इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी मेलाथिओन ५० टक्के प्रवाही २० मिली किंवा डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १५ मिली प्रति १० लि. पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने पाऊसाची तीव्रता कमी असताना फवारणी करावी. (पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.) |
| **हळद** | **वाढीची अवस्था** | • हळद पिकास नत्र खताची पहिली मात्रा एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया लागवडीनंतर ६ आठवड्यानी पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी. खते हळदीच्या ओळीलगत चर घेऊन त्यात टाकून मातीने झाकून घ्यावीत. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून संरक्षण करावे.<br>• सर्वसाधारण एका शेळीस २०० ते २५० ग्रॅम खुराक, ३ ते ४ किलो हिरवी वैरण आणि १.५ किलो वाळलेली वैरण प्रति दिन देण्यात यावी. |
| **कुकुटपालन** | - | • ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे पक्षाच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढील चार-सहा आठवड्यांपर्यंत ब्रॉयलर फिनिशर खादय दयावे. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना खते दयावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी**

| |
|---|
| फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी. |
| सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा |